(१) (i)

पावसाळा सुरू झाल्याच्या लेखकाला जाणवणाऱ्या खुणा

(१) सोसाट्याचा वारा

(२) पहिल्या पावसाची बातमी पसरवणारा मातीचा सुगंध

Scanned by TapScanner

प्र. २. पावसाच्या आगमनाचा लेखकाच्या मनावर होणाऱ्या परिणामांचा ओघतक्ता तयार करा.

पावसाच्या आगमनाने गतकाळातले क्षण जिवंत होतात.

↓

डोळ्यासमोर येऊ लागतात

पाण्यातून अलगदपणे वाहून जातात.

↓

मग डोळ्यातला कोणता आणि बाहेरचा कोणता तेच कळत नाही

प्र. ३. खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.

(अ) जिगरबाज भटके- बरेच लोक गेल्यावर ज्यांना थोडे भिनावेस वाटते, पण मोकळे

Scanned by TapScanner

३) (i) रंगिली पायवाट – डोंगरमाथ्यावर नऊ टाक्यांचा समूह आहे. तिथे जायला एक पायवाट आहे. त्या टाक्यापासून परत जाताना या ओल्या वाटेवर आपले कपडे रंगतातच. म्हणून तिला 'रंगिली पायवाट' म्हटले आहे.

(ii) डोंगराची सोंड– कावळ्या किल्ल्याकडे जाणाऱ्या ट्रेकवर वरंधा घाटाच्या उत्तरेला पसरलेल्या डोंगराचे जे सुळके आहेत, ते सोंडसारखे दिसतात; म्हणून त्याला 'डोंगराची सोंड' असे म्हटले आहे.

Scanned by TapScanner

## कृती ४ : (स्वमत कृती)

***● ‘वरंधा घाटातील निसर्गाचे विहंगम दृश्य तुमच्या शब्दांत वर्णन करा.**

**उत्तर :** पावसाळ्यात वरंधा घाटातील निसर्गसौंदर्य

Scanned by TapScanner

मनोहारी असते. पाण्यावर हिरवीगर्द झाडी झुकलेली असते. त्यातून धबधबे रोरावत बाहेर पडतात. दरीमध्ये जिकडेतिकडे हिरवळ फुललेली असते. डोंगराला ढग बिलगलेले असल्यामुळे ते ढगाळलेले असतात. पाऊस सतत पडत असतो. मोठमोठ्या खडकांवर चाबूक मारीत पाणी खळाळत वाहत असते. हे दृश्य अतिशय विहंगम असते. डोळ्यांना खूप सुखावते. त्यातच अशा पावसाळी वातावरणात टपऱ्यांमध्ये भजी-वडे-चहा असा राजेशाही, चमचमीत मेनू प्रवाशांना खायला मिळतो.

Scanned by TapScanner

## कृती ४ : (स्वमत कृती)

* • **तुमच्या शब्दांत माहिती लिहा** : (Write in your own words :)

**कावळ्या किल्ला.**

**उत्तर :** जे जिगरबाज भटके आहेत, त्यांच्यासाठी कावळ्या किल्ला सदैव तयार आहे, असे लेखकांनी म्हटले आहे. वरंधा घाटातला कावळ्या किल्ला फार मोठा आहे. तो फोडून घाटाचा शेवटचा टप्पा तयार केला आहे. श्रीवाघजाई मंदिराच्या वरच्या भागात डोंगरमाथ्याजवळ जो नऊ टाक्यांचा समूह आहे, तो पूर्वी कावळ्या किल्ल्याचाच एक भाग होता इथून खाली उतरले की डांबरी रस्ता लागतो. त्याच्या उजव्या हाताच्या वळणावर कावळ्या किल्ल्याकडे जाणारी अप्रतिम सुंदर छोटी पायवाट आहे. वरती डोंगराच्या सोंडेवर पोहोचता येते. डोंगरधारेच्या कड्यावरून जाणारी जी अरुंद पायवाट एका सपाटीवर उतरते; तेथून शेवटचे चढण चढले की त्यावरून वरंधा घाटाचे सुरेख दर्शन होते.

डोंगराच्या सोंडेच्या शेवटी कावळ्या किल्ल्याचे जोत्याचे अवशेष व ढासळून गेलेल्या बुरुजांचे अवशेष दिसतात. कावळ्या किल्ल्याची सफर अशी मनोहारी आहे.

Scanned by TapScanner

*(२) **पुढे दिलेल्या विशेष्ये आणि विशेषणांच्या योग्य जोड्या लावा :** (Match the nouns with their adjectives :)

| **विशेषणे** | **विशेष्ये** |
|---|---|
| (i) विहंगम | वारा |
| (ii) गरमागरम | पाषाण |
| (iii) घोंघावणारा | पायवाट |
| (iv) काळाशार | दृश्य |
| (v) अरुंद | कांदाभजी |

**उत्तरे :** (i) विहंगम – दृश्य

(ii) गरमागरम – कांदाभजी

(iii) घोंघावणारा – वारा

(iv) काळाशार – पाषाण

(v) अरुंद – पायवाट.

*(३) **पुढील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा :** (Identify the prepositions in the following sentences :)

(i) पुण्याहून महाडकडे जाणाऱ्या रस्त्यावर हिरवी झाडी आहे.

(ii) चमचमीत मेनू मजबूत चापायला वरंधा घाटातल्या टपऱ्यांसारखी दुसरी जागा नाही.

(iii) जिगरबाज भटक्यांसाठी कावळ्या किल्ला सज्ज आहे.

**उत्तरे :** (i) कडे, वर (ii) सारखी (iii) साठी.

Scanned by TapScanner